RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष १२, अंक ६] शुक्रवार, फेब्रुवारी २०, २०२६/फाल्गुन १, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक १/ड-९/२०२६.—ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्याअनुच्छेद २०८(१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विधानसभेने याद्वारे महाराष्ट्र विधानसभा नियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियमांना मंजुरी दिली आहे.

त्याअर्थी, "महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम २२५(३) अनुसार सदर सुधारणा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

१. (१) संक्षिप्त नाव.— या नियमास, " महाराष्ट्र विधानसभा (सुधारणा) नियम, २०२५" असे म्हणावे.

(२) ते **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र विधानसभा नियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य नियम " असा केला आहे) याच्या नियम २७० नंतर पुढील नियम जादा दाखल करण्यात येईल :—

विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज, विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे.

" २७०(अ) एखाद्या सदस्याने विनंती अर्ज सादर केल्यावर तो विनंती अर्ज समितीकडे पाठविण्यात येईल.

परंतु निःसत्र कालावधीत प्राप्त झालेले विनंती अर्ज अध्यक्षांना त्यांच्या अधिकारात समितीकडे विचारार्थ पाठविता येतील ".

३. मुख्य नियमाच्या नियम २७२ मधील :—

(१) पोट-नियम (१) वगळण्यात येईल.

(२) समासटिपेमधील, विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज, विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे " हा मजकूर वगळण्यात येईल.

मेघना तळेकर,
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

## MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

Vidhan Bhavan, Backbay Reclamation, Mumbai 400 032,
dated 20th February, 2026.

*NOTIFICATION*

No.1/D-9/2026.— Whereas, Maharashtra Legislative Assembly, in exercise of the powers conferred under Article 208(1) of the Constitution of India, has hereby approved the following rules further to amend the Maharashtra Legislative Assembly Rules.

Now therefore, in pursuance of sub-rule (3) of rule 225 to the Maharashtra Legislative Assembly Rules, the said amendments are hereby published in the *Official Gazette.*

**1.** (1) Short Title.—This rules may be called the Maharashtra Legislative Assembly (Amendment) Rules, 2025.

(2) These rules shall come into force on the date of their publication in *Official Gazette.*

2. After rules 270 of the Maharashtra Legislative Assembly Rules (hereafter referred to as " the Principal Rules ") the following rule shall be inserted :—

After presentation, petition to be referred to the committee on petition.

" 270 (A) Every Petition after presentation by a member shall be referred to the Committee on Petition :

Provided that the Speaker may refer the petiotions received during non-session period to the committee at his dicretion."

3. In rule 272 of Principal Rules :—

(1) Sub-rule (1) shall be deleted.

(2) In the marginal note, the words, "After presentation, petition to be referred to the committee on Petition" shall be deleted.

MEGHANA TALEKAR,
Secretary -2,
Maharashtra Legislative Assembly.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.